लोक आयुक्त कार्यालयाच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्र. एलपीएल - २०२६/प्र.क्र.२२ (भाग-१)/का.लोकआ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६**

**संदर्भ** :-

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय.क्र.एलपीएल १००१/प्र.क्र.११३/२००१/का.१५, दि.१६ ऑगस्ट, २००३.
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि - ०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.२९ जून, २०१७.
३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एलपीएल १०१६/प्र.क्र.७५/२०१६/का.१५ दि.२२ सप्टेंबर,२०२२
४. उच्च स्तरीय सचिव समितीचे क्रमांक:पदनि-२०२६/प्र.क्र.५१/आपुक दि.०७ जुलै, २०२६ चे इतिवृत्त.
५. दिनांक २१ जुलै, २०२६ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीचे दिनांक २८ जुलै, २०२६ रोजीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालयाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून सदर कार्यालयाची स्थापना महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ या अधिनियमाद्वारे करण्यात आली आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ तयार केला असून दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. नवीन अधिनियमानुसार लोक आयुक्त संस्थेतील सदस्यांमध्ये वाढ झाली असून, त्यांच्या अधिकार क्षेत्रातही वाढ झाली आहे. लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालयासाठी संदर्भ क्र.३ मधील दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये ८७ पदांचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता. आता नवीन अधिनियमामुळे होणारे संभाव्य बदल विचारात घेवून, लोक आयुक्त कार्यालयासाठी अतिरिक्त ५६ पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

लोक आयुक्त कार्यालयातील नवीन पदनिर्मितीमधील “उप प्रबंधक” हे पद S-२५ या वेतनश्रेणीचे असल्यामुळे, लोक आयुक्त कार्यालयाची सध्याची ८७ मंजूर पदे + ५६ नवीन पदे अशा एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मा.मंत्रिमंडळाने दिनांक २१ जुलै, २०२६ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिली आहे. त्यानुषंगाने लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या अंमलबजावणी नंतर लोक आयुक्त या संस्थेच्या अधिकार क्षेत्रात वाढ झाली असल्यामुळे, लोक आयुक्त कार्यालयाची सध्याची मंजूर पदे ८७ + नवीन पदे ५६ (३१ नियमित + २५ बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ सेवा) अशा एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. **विवरणपत्र - "अ"** मध्ये लोक आयुक्त कार्यालयास **सध्याचा ८७ अधिक नवीन ५६ पदे (३१ नियमित व २५ बाह्ययंत्रणेव्दारे) अश्या एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाचा तपशिल जोडण्यात आला आहे.**

३. लोक आयुक्त कार्यालयाने बाह्ययंत्रणेद्वारे पदांच्या सेवा घेतांना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

४. लोक आयुक्त संस्था यांच्या आस्थापनेवरील नियमित पदांकरिता तसेच बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांकरिता होणारा खर्च लोक आयुक्त कार्यालयासाठी असलेल्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय दि.२१.०७.२०२६ रोजीच्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार तसेच सन २०२६ मधील दि.३०.०६.२०२६ रोजी झालेल्या ७ व्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेस अनुसरून व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२१४/२०२६/आपुक, दि.१४.०८.२०२६ तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.२७८/२०२६/सेवा-९, दि.१४.०८.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१७१८४२१७१७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D53682C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.08.17 18:48:33 +05'30'

**(निता शिंदे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र :- विवरणपत्र - "अ"**

**प्रति,**

१. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई. (२ प्रती)
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग, आपुक, सेवा-९, व्यय-४, अर्थसंकल्प-१९, मंत्रालय, मुंबई.
८. सामान्य प्रशासन विभाग, अर्थसंकल्प (कार्यासन-२५) (दोन प्रती)

## विवरणपत्र – “अ”

### लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाचा तपशिल

| अ. क्र. | पदनाम | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना (रुपये) | दि.२२.०९.२०२२ च्या शासन निर्णयानुसार सध्याची मंजूर पदे | नव्याने मंजूरी देण्यात येणारी पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रबंधक | Grade Pay of District Judge | ०१ | – | ०१ |
| २. | अतिरिक्त प्रबंधक | एस-२७ : १२३१०० – २१५९०० | ०१ | – | ०१ |
| ३. | उप प्रबंधक | एस-२५ : ७८८०० – २०९२०० | – | ०३ | ०३ |
| ४. | सहायक प्रबंधक | एस-२४ : ७११०० – २११९०० | ०४ | ०२ | ०६ |
| ५. | अध्यक्षांचे खाजगी सचिव | एस-२५ : ७८८०० – २०९२०० | ०१ | – | ०१ |
| ६. | वरिष्ठ स्वीय सहायक | एस-२४ : ७११०० – २११९०० | ०३ | ०३ | ०६ |
| ७. | कक्ष अधिकारी | एस-१७ : ४७६०० – १५११०० | ०५ | ०५ | १० |
| ८. | जनसंपर्क अधिकारी | एस-१७ : ४७६०० – १५११०० | – | ०१ | ०१ |
| ९. | लघुलेखक (निवड श्रेणी) | एस-१७ : ४७६०० – १५११०० | ०१ | – | ०१ |
| १० | लघुलेखक (उच्च श्रेणी ) | एस-१६ : ४४९०० – १४२४०० | ०३ | – | ०३ |
| ११. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१५ : ४१८०० – १३२३०० | – | ०२ | ०२ |
| १२. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४९०० – १४२४०० | – | ०१ | ०१ |
| १३. | लेखापाल नि रोखपाल | एस-१४ : ३८६०० – १२२८०० | ०१ | – | ०१ |
| १४. | सहायक कक्ष अधिकारी | एस-१६ : ४४९०० – १४२४०० | १७ | ०५ | २२ |
| १५. | अनुवादक | एस-१३ : ३५४०० –११२४०० | ०२ | – | ०२ |
| १६. | ग्रंथपाल | एस-१० : २९२०० – ९२३०० | ०१ | – | ०१ |
| १७. | लघुटंकलेखक | एस-८ : २५५०० – ८११०० | ०२ | – | ०२ |
| १८. | लिपिक टंकलेखक | एस-६ : १९९०० – ६३२०० | २६ | ०६ | ३२ |
| १९. | वाहन चालक | एस-६ : १९९०० – ६३२०० | ०४ | – | ०४ |
| २०. | चोपदार | एस-६ : १९९०० – ६३२०० | ०३ | ०२ | ०५ |
| २१. | नाईक | एस-३ : १६६०० – ५२४०० | ०१ | – | ०१ |
| २२. | झेरॉक्स यंत्र चालक | एस-३ : १६६०० – ५२४०० | ०१ | ०१ | ०२ |
| २३. | शिपाई | एस-१ : १५००० – ४७६०० | ०९ | – | ०९ |
| २४. | सफाईगार-पहारेकरी | एस-१ : १५००० – ४७६०० | ०१ | – | ०१ |
| | **एकूण** | | **८७** | **३१** | **११८** |
| | | | | | |

**बाह्ययंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवामार्फत उपलब्ध करुन दिलेली नवीन पदे**

| अ. क्र. | पदनाम | | नव्याने मंजूरी देण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|
| १. | आय.टी स्टाफ | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०२ |
| २. | टेलिफोन ऑपरेटेर | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०१ |

| अ. क्र. | पदनाम | | नव्याने मंजूरी देण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|
| ३. | वाहन चालक | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०३ |
| ४. | शिपाई | (बाह्ययंत्रणेव्दारे) | १४ |
| ५. | अभियोजन शाखा | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०२ |
| ६. | चौकशी शाखा | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०२ |
| ७. | कोर्ट रुम स्टाफ | (बाह्ययंत्रणेव्दारे) | ०१ |
| | | **एकूण** | **२५** |

| | मंजूर पदे | नवीन पदे | एकूण |
|---|---|---|---|
| नियमित मंजूर पदे | ८७ | ३१ | ११८ |
| बाह्ययंत्रणेव्दारे नवीन पदे | - | २५ | २५ |
| **एकूण** | ८७ | ५६ | १४३ |

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D53682C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.08.17 18:48:47 +05'30'

(निता शिंदे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन